# सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना

http;//etribal.maharashtra.gov.in ही वेबसाईट विकसित करण्यात आलेली आहे.

**लाभार्थी पाञता:**

आदिवासी विकासविद्यार्थी हा अनुसूचित जमातीचा असावा. विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न रुपये 1.08 लाख किंवा त्यापेक्षा जास्त नसावे अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याची उपस्थिती प्रतीमाह 80 टक्के असणे आवश्यक राहील. शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, नामांकित शाळा, सैनिकी शाळा, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याच्या शिक्षणाचा खर्च शासनाकडून अदा करण्यात येत असल्यास अशा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याना सदर शिष्यवृत्तीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

**आवश्यक कागदपञे:**

मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचे प्रमाणपञ शिष्यवृत्तीचा लाभ घेवू इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असल्याचे मुख्याध्यापकांचे प्रमाणपञ सरपंच किंवा ग्रामपंचायत यांचेद्वारा प्रमाणित केलेले उत्पन्नाचे प्रमाणपञ बँकेच्या पासबुकाची छायांकित प्रत

# उपस्थिती भत्ता योजना

**लाभार्थी पाञता:**

इयत्ता 1 ली ते 4 थी मध्ये शिकणा-या अनुसूचीत जाती/जमाती/भटक्या जमाती मधील दारिद्रय रेषेखालील मुलींना उपस्थिती भत्ता अदा करणेत येतो मुलींच्या 75 टक्के उपस्थितीच्या आधारे प्रतिदिन 1 रुपया या प्रमाणे वर्षात जास्तीत जास्त रु.220/- प्रमाणे रक्कम अदा करण्यात येते सदर पाञ लाभार्थी मुलींची निवड निकषाप्रमाणे तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांचेकडून करण्यात येते.